दाखल तारीख – १९/०३/२०१२

नोंदणी तारीख – १९/०३/२०१२

निकाल तारीख – ३१/०७/२०२६

कालावधी – १४ व. ०४ म. १२ दि.

**(भाग–अ)**

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (कोर्ट नं.१), वरोरा, ता. वरोरा व जि. चंद्रपूर.**

(पिठासीन अधिकारी श्रीमती सुविधा ग. पांडे/यावलकर)

**सं.फौ.मा.क्र. १९४/२०१२** **निशाणी क्रमांक ११ वर पुढे**

**सीएनआर क्र. एमएचसीएच१६०००२९१२०१२**

**अभियोग पक्ष** : महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन वरोरा,
ता. वरोरा व जि. चंद्रपूर.

अभियोग पक्षाचे विधीज्ञ : सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस. ढोले.

––विरुध्द––

**आरोपी** : **रामभाऊ विठूजी घोडाम,**
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – चालक,
राह. रामपूर, ता. वरोरा,
जि. चंद्रपूर.

आरोपीचे विधीज्ञ : श्री. कुतरमारे.

---

दोषारोप :– भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३०४(अ) व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे.

---

## (भाग–ब)

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०८/०१/२०१२ |
| गुन्हा दाखल तारीख | ०८/०१/२०१२ |
| दोषारोपपत्र केल्याची तारीख | १९/०३/२०१२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०६/०७/२०१५ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकामी नेमलेली तारीख | – |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३१/०७/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | --- |

## <u>आरोपीचे विवरण</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **रामभाऊ विठूजी घोडाम,** | ०८/०१/२०१२ | २९/०३/२०१७ | ०२/०२/२०१५ | निर्दोष | --- | --- |

## <u>सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालया तर्फे साक्षीदारांची यादी</u>

**अ ) सरकार पक्ष** : –

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नानाजी गणाजी ठाकरे | घटनास्थळ पंच | ११ खाली |
| २ | पंकज बंडूजी खुळे | फिर्यादी | ११ खाली |
| ३ | वसंता विठू घोडाम | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ११ खाली |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सुभाष पंढरीनाथ गारसे | तपासी अधिकारी | ४६ |
| ५ | डॉ. भावेश रघूनाथ वानखेडे | वैद्यकिय अधिकारी | ११ खाली |

**ब ) बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी :— निरंक**

**क ) न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी :— निरंक**

**<u>सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालया तर्फे दस्तऐवजांना निशाणी देण्यात आलेली यादी</u>**

**अ ) सरकार पक्ष –**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **दस्तऐवजाचे विवरण** | **दस्तऐवजास निशाणी देण्यात आलेल्या साक्षीदाराचा क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | १४ | पी.एम. रिपोर्ट | मान्य |
| २. | १५ | ॲक्सीडेंट फॉर्म | मान्य |
| ३. | १६ | तोंडी रिपोर्ट | साक्षीदार क्र.२ |
| ४. | १७ | एफ.आय.आर. | साक्षीदार क्र.२ |
| ५. | १८ | ॲक्सीडेंट रिपोर्ट फॉर्म | मान्य |
| ६. | १९ | इन्क्वेस्ट पंचनामा | मान्य |
| ७. | २० | फौ.प्र.सं. १७५ प्रमाणे नोटिस | मान्य |
| ८. | ४७ | घटनास्थळ पंचनामा | साक्षीदार क्र.४ |
| ९. | ४८ | उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांना दिलेले पत्र | साक्षीदार क्र.४ |
| १०. | ५६ | एम.एल.सी. | साक्षीदार क्र.५ |

**ब ) बचाव पक्ष – निरंक.**
**क ) न्यायालयातर्फे निशाणी – निरंक.**
**ड ) मुद्देमाल/वस्तू – निरंक.**

## न्या य नि र्ण य

(दिनांक ३१ जुलै, २०२६  रोजी पारीत)

खटल्याचे निर्णयाकरीता खालील मुद्दे उत्पन्न होतात. त्यावरील निष्कर्ष मी खालील नमूद केलेल्या कारणमिमांसेसह विषद करीत आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो की, दि. ०८/०१/२०१२ रोजी १०.३० वाजताच्या सुमारास चंद्रपूर ते नागपूर महामार्गावर मौजा रामपूर, ता. वरोरा येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक टिप्पर क्र. एमएच.–०४–एच.–९६१२ ही मानवी जिवण धोक्यात येईल किंवा दुखापत होईल किंवा क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविली आणि त्याद्वारे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम २७९** अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| २) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो की, नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हे भरधाव व निष्काळजीपणाने चालवून दुचाकी क्र.एमएच–३४–ए.एफ.३८२१ ला धडक मारुन फिर्यादी पंकज कुकडे व गजानन राजनकर यांना दुखापत पोहचविण्यास कारणीभूत ठरला त्याद्वारे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३३७** अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| ३) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो की, नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील नमूद वाहन हे भरधाव व निष्काळजीपणाने चालवून मृतक गजानन राजनकर यांना धडक देवून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरले आणि त्याद्वारे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३०४–अ** अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो की, नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीच्या ताब्यातील वाहन निर्गमीत केलेल्या वेग मर्यादेपेक्षा अति वेगाने तसेच रस्त्याच्या परिस्थितीचे दुर्लक्ष करुन व इतर व्यक्तींना धोका निर्माण होईल अशा पध्दतीने वाहन चालविले व त्याद्वारे **मोटर वाहन अधिनियम कायदा कलम १८४** अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| ५) | आदेश काय? | **अंतिम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**०२.** प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी एकूण पाच साक्षीदार तपासले आहेत. फौजदारी मॅन्यूअल प्रमाणे झालेल्या नविन सुधारित फौजदारी मॅन्युअल मधील न्यायनिर्णय स्वरुपाच्या निर्देशानुसार वरील नमूद भाग अ–सरकार पक्ष/बचाव पक्ष/न्यायालया तर्फे साक्षीदारांची यादीमध्ये सरकार पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांचे वर्णन नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सदर नावांची पुनरावृत्ती येथे करण्यात आलेली नाही. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी गैरहजर असल्याने दि.२१.०८.२०२५ रोजी नि.क्र.१ वर सविस्तर आदेश पारीत करण्यात येवून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने दिलेल्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द होईल असा पुरावा मिळून आल्यामुळे आरोपीचे फौ.प्र.सं.३१३ प्रमाणेचे जबाब नोंदविण्यात आला.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता</u> –**

**०३.** वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यावरील कारणमिमांसा आणि पुरावा पुन्हा विवेचीत करण्यापेक्षा त्यावरील कारणे मी एकत्रीत नोंदवित आहे.

**०४.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व ३ हे घटनास्थळ पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी रामपूर बस स्थानकाजवळ बोलाविल्याचे सांगितले. पुराव्यादरम्यान त्यांनी पुढे सांगितले की, पोलिसांनी त्यांच्या समक्ष

पंचनामा केला नाही. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य करुन इतर मजकूर नाकारला. सदर दोन्ही साक्षीदारांनी सरकार पक्षास सहाय्य न केल्यामुळे त्यांना सुचक प्रश्न विचारले असता त्यांनी पंचनामा त्यांच्या समक्ष झाल्याची बाब नाकारली आहे. सदर साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी सरकार पक्षाने केलेल्या कथनांना पोषक असा पुरावा दिलेला दिसून येत नाही.

**०५.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ हे फिर्यादी असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात घटना सन २०१२ साली रामपूर या ठिकाणी सकाळी १०.०० ते १०.३० वाजताचे दरम्यान घडली. घटनेच्या दिवशी ते व मृतक गजानन राजनकर दुचाकी वाहनाने चंद्रपूर येथून नागपूर कडे जात होते. त्यांना रामपूर जवळ एका ट्रकने धडक दिली. ते रस्त्याने डाव्या बाजूने जात असतांना ट्रक त्यांच्या समोरच्या दिशेने डाव्या बाजूने आला व त्यांना धडक दिल्यामुळे ते दोघेही खाली पडले. त्यामुळे त्यांना मार लागला. त्यानंतर त्यांनी गजाननला राजू ढाबेवाला याच्या चारचाकी वाहनात टाकून दवाखान्यात घेवून जात असतांना रस्त्यात त्याचा मृत्यू झाला. धडक देणाऱ्या ट्रकचा क्रमांक एमएच–०४–९६१२ असा असल्याचे सांगितले. घटनेच्या वेळी ट्रक चालकाने त्याचा ट्रक निष्काळजीपणे चालविल्यामुळे अपघात झाला. घटनेच्या वेळी ट्रक चालक त्याचा ट्रक सोडून पळून गेल्यामुळे त्यांनी त्याला पाहिले नाही. त्यांना वरोरा येथील सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. तोंडी रिपोर्ट(नि.क्र.१६) व छापील एफ.आय.आर.(नि.क्र.१७) सिध्द केली. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वकिलामार्फत उलटतपास घेतला असता घटनेच्या वेळी चंद्रपूर नागपूर महामार्गाचे काम सुरु असल्याचे सांगितले. ट्रक चालकाने त्यांच्या बाजूचा रस्ता चांगला असल्यामुळे ट्रक त्या बाजूला वळविला होता. त्यांनी पुढे मान्य केले की, घटनेच्या वेळी गाडी ट्रकच्या मागच्या चाकात गेली होती. त्यांनी सुचविलेल्या इतर बाबी नाकारल्या आहेत. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी घटनेच्या वेळी चंद्रपूर नागपूर महामार्गाचे काम सुरु होते, ही बाब सिध्द केली आहे.

**०६.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.४ हे तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात दि.०८/०१/२०१२ रोजी ते वरोरा पोलीस ठाणे येथे कार्यरत असतांना दि.०९/०१/२०१२ रोजी अप.क्र.१५/२०११ चा तपास त्यांच्याकडे देण्यात आला.

तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४७), दोन्ही वाहनांची उप प्रादेशीक परिवहन अधिकारी यांच्या मार्फत तपासणी करुन घेतलेले प्रमाणपत्र (नि.क्र.४८) सिध्द केला. त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले. आरोपीची अटक केली. मयताचे व जखमीचे कागदपत्रे दवाखान्यातून प्राप्त केले. आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हलगर्जीपणे चालविले त्यामुळे सदरचा अपघात झाला. आरोपी विरुध्द पुरावा आल्याने त्यानी त्याच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले, याबाबी स्पष्ट केल्या. त्यांचा आरोपीच्या विधीज्ञांनी उलटतपास घेतला असता घटनेच्या वेळी घटनास्थळावरील रस्त्याचे काम सुरु होते ही बाब मान्य केली तर सुचविलेल्या सर्व बाबी त्यांनी नाकारल्या आहेत.

०७. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.५ हे वैद्यकिय अधिकारी असून त्यांनी त्यांच्या पुराव्यात दि.०८/०१/२०१२ रोजी ते वैद्यकिय अधिकारी म्हणून उप जिल्हा रुग्णालय, वरोरा येथे कार्यरत असतांना त्यांच्या कडे दोन व्यक्तींना वैद्यकिय तपासणी करीता आणण्यात आले. त्यांनी दोन्ही व्यक्तीची तपासणी केली असता गजानन नथ्थूजी राजनकर हे मयत झाल्याचे सांगितले. तसेच पंकज बंडूजी कुकडे यांना खरचटल्याचे व साध्या जखमा आढळून आल्याचे सांगितले. त्यांनी एम.एल.सी.(नि.क्र.५६) सिध्द केली. त्यांचा आरोपीच्या विधीज्ञांनी उलटतपास घेतला असता जखमीने सांगितलेल्या अपघाताचा उल्लेख त्यांच्या वैद्यकिय प्रमाणपत्रात कोठेही नाही. तसेच जर कोणी रोडच्या कड्याला पडले असता त्यांना एम.एल.सी. मध्ये नमूद असलेल्या दुखापती होवू शकतात, याबाबी त्यांनी मान्य केल्या व सुचविलेल्या इतर बाबी नाकारल्या.

०८. प्रस्तुतचे प्रकरण आरोपी विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३०४–अ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे चालविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने अभिलेखावरील साक्षीदार क्र.१ ते ५ यांची साक्ष महत्वाची आहे. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ व ३ हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्यांनी सरकार पक्षास पोषक असा पुरावा दिलेला नाही. साक्षीदार क्र.२ हे फिर्यादी आणि अपघातातील प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार असून त्यांनी पुराव्याच्या आधारे घटनाक्रम स्पष्ट केला. परंतु, त्यांनी दिलेली वर्दी आणि अभिलेखावरील पुरावा यांचे अवलोकन केले असता प्रत्यक्षात आरोपीच्या चुकीमुळे अपघात झाला याचा स्पष्ट असा पुरावा त्यांनी दिलेला दिसून येत नाही. घटनेच्या वेळी ट्रक

चालक पळून गेल्यामुळे फिर्यादीने त्याला पाहिले नाही, ही बाब फिर्यादीने स्पष्ट केली आहे. तसेच अभिलेखावरील फिर्याद(नि.क्र.१६) चे अवलोकन केले असता फिर्यादीने ट्रक एकदम डाव्या साईडने आल्याने गजाननने आपली गाडी नवीन रस्त्यावरुन जुन्या रस्त्यावर घेतली. ट्रकने नवीन रस्त्यावरुन जुन्या रस्त्यावर वेगाने ट्रक आणल्यामुळे त्याचा धक्का लागून मयत आणि जखमी फिर्यादी हे खाली पडल्यामुळे अपघात झाल्याचे कथन त्यांनी फिर्यादमध्ये केले आहे. तर पुराव्यादरम्यान ट्रक समोरच्या दिशेने डावीकडून आला आणि धडक दिल्यामुळे आम्ही दोघेही खाली पडलो असे कथन फिर्यादीने केले आहे. फिर्यादीने दिलेली फिर्याद आणि अभिलेखावरील पुरावा पाहता निश्चीत अपघात कसा झाला याचा स्पष्ट असा पुरावा फिर्यादीने दिलेला नाही. थोड्या वेळा करीता फिर्यादीने केलेले कथन ग्राह्य धरले तर ट्रक समोरच्या दिशेने वेगात आल्यामुळे फिर्यादी आणि मयत यांच्या दुचाकीला धडक दिल्यामुळे अपघात झाल्याचे दिसून येते. परंतु फिर्यादीने घटनेच्या वेळी त्यांची गाडी ट्रकच्या मागच्या चाकात गेली होती, असे कथन केले आहे. अशा परीस्थीतीत फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे घटनेच्या वेळी ट्रक चालकाने वेगाने ट्रक डाव्या बाजूने समोरच्या दिशेने फिर्यादी आणि मयत यांच्या मोटर सायकलकडे आणला असता अपघात हा फिर्यादी आणि जखमी यांच्या बाबतीत समोरच्या दिशेने होणे अपेक्षीत आहे. परंतु, त्यांची गाडी ही ट्रकच्या मागच्या चाकात गेली असल्याचे कथन फिर्यादीने केले आहे. तसेच सदरील दोन्ही महत्वपूर्ण बाबी त्यांनी त्यांच्या फिर्यादीत कोठेही नमूद केलेल्या नाही. केवळ ट्रक चालकाने त्याचा ट्रक नवीन रस्त्यावरुन जुन्या रस्त्यावर वेगाने आणल्यामुळे ट्रकचा धक्का लागला आणि ते दोघेही खाली पडले, असे कथन केले आहे. वास्तविक पाहता, फिर्यादीने तक्रार देतेवेळी दिलेल्या अपघाताचे स्वरुप आणि अभिलेखावर पुराव्यादरम्यान कथन केलेला घटनाक्रम हा एकमेकांशी सुसंगत असा नाही. त्याचप्रमाणे घटनेच्या वेळी ट्रक चालक हा पळून गेल्यामुळे फिर्यादीने त्याला पाहिले नाही. अशा परीस्थीतीत प्रत्यक्षात प्रकरणातील आरोपी हाच घटनेचा वेळी ट्रक चालक होता, याबाबतचा स्पष्ट पुरावा फिर्यादीने दिलेला नाही.

**०९.** प्रकरणातील साक्षीदार क्र.४ तपासी अधिकारी यांनी जरी घटनास्थळ पंचनामा सिध्द केला असला तरीही पंचनाम्यात नमूद केलेली घटनास्थळावरील परीस्थीती ही ट्रक चालकाने दुचाकीला पाठीमागून ठोस मारल्याने अपघात झाल्याची परिस्थीती दर्शविलेली आहे. अशा परीस्थीतीत प्रत्यक्ष फिर्यादीने कथन केलेली अपघाताची घटना, तोंडी रिपोर्टमध्ये

उल्लेख केलेली अपघाताची घटना आणि घटनास्थळ पंचनाम्यात नमूद केलेली घटनास्थळावरील परीस्थीती या तिन्ही बाबी एकमेकांशी सुसंगत अशा नाही. त्यामध्ये तफावत आढळून येते. साक्षीदार क्र.४ यांनी ज्या पंच साक्षीदारांच्या उपस्थीतीत पंचनामा तयार केला, त्यांनी देखील सरकार पक्षास सहाय्य केलेले नाही. तसेच पंचनाम्यातील मजकूर तंतोतंतपणे सिध्द केलेला नाही. प्रकरणातील साक्षीदार क्र.५ हे वैद्यकिय अधिकारी असून जरी पुराव्यादरम्यान त्यांनी फिर्यादी यांना झालेल्या जखमा वैद्यकिय प्रमाणपत्रात नि.क्र.५६ च्या आधारे सिध्द केल्या असल्या तरीही सदरच्या जखमा या प्रत्यक्षात आरोपीने घडवून आणलेल्या अपघातामुळेच झाल्या, ही बाब सबळ पुराव्याच्या आधारे येथे स्पष्ट होत नाही.

**१०.** आरोपी विरुध्दचे दोषारोप पाहता घटनास्थळावरील इतर साक्षीदारांचे साक्ष नोंदविलेली दिसून येत नाही. तसेच घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक टिप्पर क्र. एमएच.–०४–एच.–९६१२ ही मानवी जिवण धोक्यात येईल किंवा दुखापत होईल किंवा क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून फिर्यादी यांच्या दुचाकी क्र.एमएच–३४–ए.एफ.–३८२१ ला धडक देवून फिर्यादी पंकज कुकडे यांच्या दुखापतीला व गजानन राजनकर यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला, ही बाब सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ ते ५ यांच्या पुराव्याच्या आधारे संशयाच्यापलीकडे जावून सिध्द केलेली नाही. त्यामुळे पुराव्या अभावी उत्पन्न होणाऱ्या संशयाचा फायदा आरोपीला देणे न्यायोचीत ठरते. परिणामी, सरकार पक्षाने आरोपी विरुध्दचे आरोप संशयाच्या पलिकडे सिध्द न केल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून वरील चर्चेच्या आधारे मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **रामभाऊ विठूजी घोडाम** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३३७, ३०४–अ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४ मधील आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जुने जामीन व वैयक्तीक बंधपत्र पुढिल सहा महिन्याकरीता कायम ठेवण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

Digitally signed by SUVIDHA GAJANAN PANDE
Date: 2026.07.31 15:35:10 +0530

ठिकाण – वरोरा.
दिनांक – ३१/०७/२०२६.

(सुविधा ग. पांडे/यावलकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), वरोरा.

# **C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the Judgment order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | C. N. Lohakare, |
| Court Name | :- | Court of J.M.F.C. (Court No.1) Warora, Dist. Chandrapur. |
| Date of Judgment | :- | 31/07/2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | :- | 31/07/2026 |
| Judgment uploaded on | :- | 31/07/2026 |